कायम विनाअनुदान तत्वावर
(इंग्रजी माध्यम)

जाक्र. प्राथ-२०२/खाप्राशा/मा.इंगजी/२०१८-१९/५६५६
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,
दिनांक : - 5 AUG 2019

प्रति
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद पुणे

विषय: प्रथम मान्यता मिळणेबाबत
श्री गाडगे महाराज इंग्लिश मिडीयम विद्यामंदिर, ओतुर, ता.जुन्नर जि. पुणे

संदर्भ: १. शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्र. नप्राशा-१००८/प्र.क्र.६७९/प्राशि-३ दि २०.०८.२००९
२. या कार्यालयाचे शाळा परवानगी आदेश दि ०२.१२.२००९
३. या कार्यालयाचे शाळा परवानगी आदेश दि ३१.१२.२०११
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांचे पत्र जाक्र जि.प. शिक्षण/ प्राथ/खाप्रशा/९५५/२०१९ दि ०५.०७.२०१९

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला संदर्भ क्र- १, २ आणि २ अन्वये तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व इंग्रजी माध्यमासाठी सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये कायम विनाअनुदान तत्वावर शाळेस परवानगी देण्यात आलेली आहे. सदरची शाळा सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षामध्ये सुरु केलेली असून सदर शाळेस प्रथम मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव संदर्भ क्र.४ चे पत्रान्वये प्राप्त झालेला आहे. प्राप्त प्रस्तावानूसार सदर संस्थेच्या शाळेस नविन प्राथमिक शाळा सुरु करण्यास जून,२०१०-११ पासून इ. १ ली च्या वर्गास प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६ |
| १. | श्री गाडगे महाराज मिशन मुंबई-४, विद्यार्थी भुवन त्रिभुवन रोड, मुंबई | श्री गाडगे महाराज इंग्लिश मेडियम विद्यामंदिर, ओतुर, ता.जुन्नर जि. पुणे | १ ली | इंग्रजी | जून २०१० पासून |

१. शाळेची इमारत व परिसर शिक्षणसंकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२. शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३. संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

४. संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे.तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सूयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजे.

५. संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

६. संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तीशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

७. संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादीमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

Scanned with OKEN Scanner

८. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

९. संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

१०. शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यांत येईल.

११. जनहितार्थ या.क्र.४८३/०४ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४ एप्रिल, २००९ रोजी दिलेल्याआदेशानुसार खालील बाबींची पूर्तता करावी.

१.शाळामध्ये सहा महिन्याच्या आत अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

२.शाळेच्या इमारतीमध्ये ज्वलनशील आणि घातक वस्तू ठेवण्यात येवू नयेत.

३.शाळेचा संबंधित कर्मचारी वृंद आणि इतर कर्मचारी यांना अग्निशमन यंत्रणा वापरण्याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण देण्यांत यावे.

४ सदर शाळेची इमारत सर्व दृष्टीकोनातून सुरक्षित असल्याची तसेच (National Building code of India अंतर्गत विहीत केलेल्या मानकाप्रमाणे शाळेची इमारत बांधली असल्याची खात्री मान्यता देणेपूर्वी करण्यात यावी व तसे प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांची राहील.

५ प्रत्येक शाळेच्या इमारतीची सुरक्षिततेच्या दृष्टीने नियमित तपासणी करण्यात यावी. संबंधित अधिकारी यांनी (National Building code of India) चे काटेकोरपणे पालन करावे. वरील काम जे अधिकारी/ कर्मचारी करणार नाहीत त्यांचेवर कडक शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद पुणे यांनी शासन नियमानुसार खात्री करुन प्रथम मान्यतेचे आदेशाबाबत पुढील कार्यवाही करावी.

MRaut

(मिनाक्षी राऊत)
प्र.शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे-१
३. मा.शिक्षण संचालक, (प्राथमिक),प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
४. अध्यक्ष/सचिव, श्री गाडगे महाराज मिशन मुंबई-४, विद्यार्थी भुवन त्रिभुवन रोड, मुंबई

Scanned with OKEN Scanner